# नि.दि.मु.क्र.२०/२०१४ मधील निशाणी क्र.१८७ वरील आदेश
## (**CNRNo.MHSI**080001322014)

०१. प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्र.२६(१) ते २६(३) यांनी वृक्षअधिकारी, कणकवली यांचेविरुध्द अजामीनपात्र अधिपत्र निर्गमित करण्याकरीता दाखल केला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तूत कामी न्यायालयाने नि.क्र.१८४ वरील आदेशान्वये साक्षीसमन्स पाइवले होते. सदरचे साक्षीसमन्स बजावणी झाली आहे. तरी सदर साक्षीदार न्यायालयात हजर राहण्यास टाळाटाळ करत आहे. सबब सदर साक्षीदाराविरुध्द अजामिनपात्र अधिपत्र निर्गमित करणेबाबत व सदर साक्षीदारास हजर राहणेबाबत आदेश करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०२. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्जास हरकत घेतली आहे. त्यांनी असे नमुद केले आहे की, वृक्षअधिकारी, कणकवली यांचे विरुध्द अजामिनपात्र अधिपत्र निर्गमित न करता जामिनपात्र अधिपत्र निर्गमित करता येऊ शकते.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, वृक्षअधिकारी यांना कागदपत्रे दाखल करण्याकरीता अर्ज नि.क्र.१८४ वरील आदेशाप्रमाणे समन्स निर्गमित करण्यात आले होते. सदर साक्षीदारास अहवाल

नि.क्र.१८६ प्रमाणे बजावणी करण्यात आलेली आहे. परंतू, त्यांनी हजर होऊन प्रस्तावित कागदपत्रे दाखल केलेली नाहीत किंवा सदर कागदपत्रे न्यायालयात पाठवली देखील नाहीत. त्यामुळे, वृक्षअधिकारी कणकवली यांचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १६ नियम १०(२) प्रमाणे जाहीरनामा निर्गमित करणे योग्य होईल. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.१८७ हा मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.१८७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वृक्षअधिकारी, कणकवली यांचेविरुध्द जाहीरनामा निर्गमित करण्यात यावा.

सही/-
(टी.एच.शेख)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी.

स्थळ : कणकवली
दिनांक : १४/०२/२०२४